# RAJASTHAN SECURITIES LIMITED

**(Previously known as Rajasthan Gases Limited)**

**Date: 17/08/2026**

**To,**
**The Manager,**
**Corporate Relationship Department,**
**Bombay Stock Exchange,**
**1st Floor, New Trading Ring,**
**Rotunda Building, P.J. Towers,**
**Dalal Street, Fort,**
**Mumbai – 400001.**

**Scrip Code: 526873**

**Sub.: - Newspaper Clipping- Disclosure under Regulation 30 and Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.**

**Dear Sir,**

Pursuant to Regulation 30 and Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we hereby enclose copies of newspaper clipping published regarding extract of the Unaudited Financial Results for the Quarter Ended 30th June, 2026, in the following newspapers on 15th August, 2026.

a. Financial Express (English)
b. Mahasagar (Marathi)

You are requested to take the above submission on records.

Thanking You.

**Yours Faithfully,**
**For Rajasthan Securities Limited**
**(Formerly known as Rajasthan Gases Limited)**

Nikhilesh Narendrakumar Khandelwal
Digitally signed by Nikhilesh Narendrakumar Khandelwal
Date: 2026.08.17 11:39:54 +05'30'

**Nikhilesh Khandelwal**
**Managing Director**
**DIN: 06945684**

**Encl.: As above**

**Registered Office: Shop No.107, Plot no. 268, Honey Arjun Kauslya tower, C.A ROAD, Lakadganj, Nagpur - 440008, Maharashtra, India**
**Contact: 9371001503,** **Email: info@rajasthangasesltd.com**
**Web: www.rsl.in** **CIN: L64990MH1993PLC272204**

# २ ते ४ दिवसांत बँक खात्यात जमा होणार कर्जमाफीचे पैसे, कृषिमंत्री भरणेंची घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
**वाशिम, दि. १४ :**
राज्य सरकारने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'ची प्रक्रिया सध्या वेगात सुरू आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जात आहे.

मात्र, अद्यापही राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात कर्जमाफीचे पैसे प्रत्यक्ष जमा न झाल्यामुळे, मदतीच्या प्रतीक्षेत असलेला बळीराजा सध्या चिंतेत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

शेतकऱ्यांच्या या परिस्थितीवर राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशिम येथे बोलताना एक महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक माहिती दिली आहे. येत्या दोन ते चार दिवसांत कर्जमाफीचे सुमारे पाच ते दहा हजार कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जातील, अशी मोठी घोषणा त्यांनी केली आहे. कृषिमंत्र्यांच्या या आश्वासनामुळे कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो शेतकऱ्यांना आता मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

सध्या 'अ‍ॅग्रीस्टॅक' प्रणालीच्या माध्यमातून कर्जमाफीच्या याद्या पडताळणीचे काम प्रगतीपथावर असून, शासनाकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याने जसजशा याद्या अद्ययावत होतील, तसतशी रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे. या संपूर्ण कर्जमाफी योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना एकूण ४० हजार ५८५ कोटी रुपयांचा मोठा लाभ होणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दत्तात्रय भरणे यांनी वाशिम येथे दिली.

शहरी भागातील शेतकऱ्यांनाही लवकरच मिळणार कृषी योजनांचा लाभ वाशिम येथे पत्रकारांशी संवाद साधताना, शहरी भागातील शेतकऱ्यांना सिंचन विहीर आणि इतर कृषी योजनांचा लाभ मिळत नसल्याची बाब पत्रकारांनी निदर्शनास आणून दिल्यावर दत्तात्रय



भरणे यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली. या समस्येबाबत आपल्याला पूर्वकल्पना नसल्याची कबुली देत, येत्या काळात शहरी भागातील शेतकऱ्यांनाही शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळावा यासाठी योग्य ती तरतूद निश्चितपणे केली जाईल, असे महत्त्वपूर्ण आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

सातबारा उताऱ्यावर नोंद नसलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा ज्या शेतकऱ्यांची नावे सातबारा उताऱ्यावर किंवा इतर अधिकारात नोंदवली गेलेली नाहीत, अशा राज्यातील तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांना आता

**शेतकऱ्यांच्या या परिस्थितीवर राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशिम येथे बोलताना एक महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक माहिती दिली**

अधिकृत रेकॉर्डवर आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या अत्यंत महत्त्वाच्या निर्णयामुळे या सर्व वंचित शेतकऱ्यांचा 'अ‍ॅग्रीस्टॅक' मध्ये समावेश होण्याचा मार्ग मोकळा होणार असून, आता त्यांनाही कर्जमाफीसह शासनाच्या इतर विविध कृषी योजनांचा थेट लाभ मिळवणे शक्य होणार आहे. या निर्णयाची तत्काळ आणि प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी येत्या १५ दिवसांच्या आत यासंदर्भातील सविस्तर अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत.

# पालखीतील 'गण गण गणात बोते'च्या गजराने किनगावराजा झाले भक्तिमय

■ महासागर प्रतिनिधी
**किनगावराजा, दि. १४**
पंढरपूर येथून आषाढी एकादशीच्या सोहळ्यानंतर श्रीक्षेत्र शेगाव येथे परतीच्या मार्गावर असलेल्या श्री संत गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्याचे आज, दि. १२ ऑगस्ट शहरात उत्साहात स्वागत करण्यात आले. पांढऱ्या शुभ्र पोशाखातील ७५० वारकरी... हातात टाळ, खांद्यावर भगवे झेंडे ... एकसारखी पडणारी पावले आणि मुखातून अखंड 'गण गण गणात बोते'चा जयघोष असा मन प्रसन्न करणारा भक्तिमय सोहळा शहरवासीयांना अनुभवायला मिळाला. पालखीचे आगमन होताच अवघे शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले.

श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे आज सकाळी दहाच्या सुमारास शहरात आगमन झाले. पालखी दाखल होताच भाविकांनी 'गण गण गणात बोते'चा जयघोष करत श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले. फुलांनी सजवलेल्या पालखीत विराजमान 'श्रीं'चे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

तब्बल ५५० किलोमीटरचा परतीचा पायी प्रवास करूनही वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर थकव्याऐवजी भक्तीचा उत्साह ओसंडून वाहत होता. पांढऱ्या शुभ्र पोशाखातील वारकरी हातात टाळ व भगवे झेंडे घेऊन एकसारखी पावले टाकत मार्गक्रमण



करत होते. टाळ-मृदंगाच्यातालावर पडणारी वारकऱ्यांची पावले आणि मुखातील 'गण गण गणात बोते'च्या गजराने भाविकांचे मन प्रसन्न झाले. पालखीच्या स्वागतासाठी महिलांनी आकर्षक रांगोळ्या साकारल्या होत्या. बस स्थानकापासून पोलिस ठाण्यापर्यंतचा पालखी मार्ग रांगोळ्यांनी सजवण्यात आला होता. पोलिस ठाण्याच्या परिसरात श्री गजानन महाराजांची सुंदर रांगोळी साकारण्यात आली. ही रांगोळी भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती.पालखीच्या आगमनानंतर महामार्गापासून बाजार गल्ली तसेच पोलिस ठाण्याच्या परिसरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. लहान मुलांच्या खेळण्यांची दुकाने तसेच विविध खाद्यपदार्थांचे स्टॉलही सजले होते. भगवे झेंडे, टाळ – मृदंगाचा निनाद आणि वारकऱ्यांच्या जयघोषामुळे संपूर्ण शहर भक्तिमय झाले होते. या दरम्यान वारकऱ्यांच्या सेवेसाठी नागरिकांनी पुढाकार घेतला. ठिकठिकाणी वारकऱ्यांना दूध, चहा, फळे, फराळ व बिस्किटांचे वितरण करण्यात आले.

श्री गजानन महाराजांची पालखी पोलिस ठाण्याच्या परिसरात नागरिकांना दर्शनासाठी थांबवण्यात आली. या ठिकाणी वारकरी व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली. यावर्षी महाप्रसादाचे मानकरी म्हणून प्रल्हाद रामकिसन काळे, उत्तमराव गवारे, संपतराव झोरे, गजाननराव कासतोडे, लक्ष्मण शेळके, फुलसिंग देवरे, भगवान केवट, पंढरी काकड, विश्वनाथ काकड, रमेश मखरीजे, गणेश माटे, राम पारखे, विठ्ठलराव कायंदे, शिवाजी उबाळे, मैनाजी झोरे, सखाराम हरकळ, विजय घिके, सुनील उत्तमराव झोरे, प्रमोद काकड, प्रकाश मंजाराम जायभाय, डी. जे. जाधव व आंधळे आदींनी पुढाकार घेतला. या पालखी सोहळ्यात किनगावराजा येथील नागरिकांनी उत्साहात सहभाग घेतला होता.

# विदर्भ रेल्वे कनेक्टिव्हिटीसाठी खा. धोत्रेंची रेल्वे बोर्डाकडे मागणी

## अकोला ढोण दुहेरीकरण, चार सुपरफास्ट ट्रेनची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. १४ :**
विदर्भ आणि मराठवाडा या दोन्ही प्रदेशांतील रेल्वे सुविधांचा कायापालट करण्यासाठी आणि प्रवाशांना अधिक वेगवान कनेक्टिव्हिटी मिळवून देण्यासाठी खासदार अनुप धोत्रे यांनी रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सतीश कुमार यांची भेट घेऊन त्यांना विविध प्रलंबित मागण्यांचे लेखी निवेदन सादर केले. खासदार धोत्रे यांनी विशेषतः अकोला जिल्हा आणि परिसरातील रेल्वे प्रकल्पांना गती देण्यासाठी ठोस मागण्या लावून धरल्या आहेत. यामध्ये अकोला–ढोण रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम तातडीने सुरू करणे, तसेच अकोला-पूर्णा खंड आणि पूर्णा बायपासशी संबंधित प्रलंबित कामे वेगाने पूर्ण करण्याचा समावेश आहे. याशिवाय, हैदराबाद-अजसे (ट्रेन क्र. १७६०५/१७६०६) चा अतिरिक्त वेळ कमी करून तिचे वेळापत्रक सुधारणे किंवा तिला सुपरफास्ट दर्जा देणे, तसेच हैदराबाद-गोरखपूर (ट्रेन क्र. ०७०७५/०७०७६) ही गाडी पूर्णा-अकोला मार्गावरून नियमितपणे चालवण्याची मागणी त्यांनी केली. संपूर्ण क्षेत्राचा विचार करता, नांदेड-श्री गंगानगर ट्रेन दररोज केल्यास हिंगोली, वाशीम आणि अकोला परिसराला सुरत-अहमदाबादसाठी थेट रोजची ट्रेन उपलब्ध होईल.

तसेच नांदेड-जम्मूतवी हमसफर एक्स्प्रेसचा विस्तार श्री माता वैष्णो देवी कटरापर्यंत करून ती दररोज चालवावी, हिंगोली मार्गे चार नवीन सुपरफास्ट ट्रेन सुरू कराव्यात आणि अमरावती-तिरुपती ट्रेन दररोज करावी, अशा प्रमुख मागण्याही त्यांनी लावून धरल्या.

या सर्व रेल्वे गाड्या व मार्गांमुळे अकोला आणि परिसरातील धार्मिक यात्रांना सुलभता मिळेल, तसेच व्यापारी व औद्योगिक उपक्रमांना मोठी चालना मिळून क्षेत्राचा सर्वांगीण विकास होईल, असा विश्वास खासदार अनुप धोत्रे यांनी व्यक्त केला.

अकोल्यासाठी खासदार धोत्रे यांच्या मुख्य मागण्या अकोला-ढोण मार्ग दुहेरीकरणाचे काम तातडीने सुरू करावे. पूर्णा बायपाससह प्रलंबित कामे वेगाने पूर्ण करावीत. ट्रेन क्रमांक १७६०५/१७६०६ (हैदराबाद-अजमेर)चे वेळापत्रक तर्कसंगत करून सुपरफास्ट दर्जा द्यावा.

ट्रेन क्रमांक ०७०७५/०७०७६ (हैदराबाद-गोरखपूर) पूर्णा-अकोला मार्गावरून नियमित चालवावी.

# सत्संग सोहळ्यास जाताना गाडी उलटली



■ महासागर प्रतिनिधी
**चोहोट्टा बाजार दि. १४ :** अकोला ते अकोट महामार्गावरील दहीहांडा फाटा ते गोपाळखेड बायपास मार्गावर सत्संग सोहळ्यासाठी जाणाऱ्या एका खासगी प्रवासी वाहनाला अपघात झाला. वाहनाचा स्टेअरिंग रॉड तुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि वाहन रस्त्याखाली उतरून थेट शेतात उलटले. सुदैवाने या अपघातात सर्व प्रवासी सुरक्षित आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, अकोला येथे आयोजित सत्संग सोहळ्यासाठी हे वाहन चार ते पाच प्रवाशांना घेऊन जात होते. दहीहांडा फाटा- दहीहांडा बायपास मार्गावरील वळणावर अचानक स्टिअरिंगमध्ये तांत्रिक बिघाड झाला. काही क्षणांतच वाहन अनियंत्रित होऊन रस्त्यावरून घसरत शेतात गेले आणि उलटले.

कठड्यांचा प्रश्न ऐरणीवर अपघातामुळे दहीहांडा फाटा –गोपाळखेड बायपास मार्गावरील रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

धोकादायक वळणावर आवश्यक सुरक्षा कठडे, दिशादर्शक फलक व रिफ्लेक्टर नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. 'आज वाहन शेतात जाऊन थांबले म्हणून मोठा अनर्थ टळला, पण प्रशासन अपघात घडल्यानंतरच जागे होणार का, असा सवाल नागरिक विचारत आहेत.

## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
### (OFFLINE) TENDER NOTICE

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites tenders in appropriate form for the following works. These tenders can be purchased by Registered Contractors from the office of the Executive Engineer (Electrical), NMC, Nagpur. Purchase and submission of tenders can be done from the office of the Executive Engineer (Electrical), NMC, Nagpur

| Name of the work | Project Cost in Rs. |
|---|---|
| Dismantling & Re-erection of existing ducting Coolers of New Administrative Building entire floor lobby for Civil work, NMC, Nagpur | 8,28,244/- |

**Note – 1)** Tender Submission end date : - **20-08-2026 (3.00 PM)**
**2)** Date of Opening of Tender (If Possible) : **21-08-2026 (3.00 PM)**
**3)** Rates are exclusive of G.S.T.

**Advt No. 285 PR** **Executive Engineer (Electrical)**
**Date 14.08.2026** **N.M.C., Nagpur**

## पोपीज बेबी केअर इंडिया लिमिटेड
(पूर्वीचे नाव: हरी गोविंद इंटरनॅशनल लिमिटेड)
१२५, वर्धमान नगर, राधा कृष्ण मंदिर जवळ, नागपूर, नागपूर, महाराष्ट्र, भारत, ४४०००८
Email: hgil.ngp@gmail.com | Website: www.popeesbabycare.com
CIN : L99999MH1989PLC050528

**३०.०६.२०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीच्या स्वतंत्र, लेखापरीक्षण न केलेल्या आर्थिक निकालांच्या विवरणाचा उतारा**

रुपये लाखांमध्ये

| तपशील | तिमाही समाप्ती | | | वर्ष समाप्ती |
|---|---|---|---|---|
| | 30.06.2026 (लेखापरीक्षण न केलेले) | 31.03.2026 (लेखापरीक्षण न केलेले) | 30.06.2025 (लेखापरीक्षण न केलेले) | 31.03.2026 (लेखापरीक्षण केलेले) |
| संचालनातून मिळणारे एकूण उत्पन्न (निव्वळ) | 1572.85 | 260.34 | 0.00 | 260.34 |
| इतर उत्पन्न | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| एकूण खर्च | 1510.12 | 251.02 | 0.00 | 251.02 |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी) | 62.73 | 9.32 | 0.00 | 9.32 |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (करापूर्वी आणि अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | 62.73 | 9.32 | 0.00 | 9.32 |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (करानंतर आणि अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | 62.73 | 9.32 | 0.00 | 9.32 |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न ज्यात नफा/(तोटा) समाविष्ट आहे कालावधी (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) | 62.73 | 9.32 | 0.00 | 9.32 |
| समभाग भांडवल | 852.50 | 852.50 | 500.00 | 852.50 |
| प्रति शेअर उत्पन्न (चालू आणि बंद केलेल्या कामकाजासाठी असाधारण व्याज (प्रत्येकी रु. १०/-) आकारण्यापूर्वी) | 10.00 | 10.00 | 10.00 | 10.00 |
| मूलभूत आणि सौम्यीकृत | 0.18 | 0.03 | 0.00 | 0.11 |

टीप:-
१ वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आणि त्यानंतर १४ ऑगस्ट, २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत संचालक मंडळाने त्यांना मंजुरी दिली.
२ वरील माहिती ही सेबी (सूचीबद्धता आणि इतर प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या त्रैमासिक आर्थिक निकालांच्या तपशीलवार नमुन्याचा एक उतारा आहे. त्रैमासिक आर्थिक निकालांचा संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या www.bseindia.com (s) या संकेतस्थळावर आणि कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
पोपीज बेबी केअर इंडिया लिमिटेडसाठी
सही/-
शाजू थॉमस
डीआयएन: ०६४१२९८३
व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण : नागपूर
दिनांक : १४/०८/२०२६

## RSL
## राजस्थान सिक्युरिटीज लिमिटेड
(पूर्वीचे नाव: राजस्थान गॅसेस लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: दुकान क्र. १०७, प्लॉट क्र. २६८, हनी अर्जुन कौशल्या टॉवर, सी.ए. रोड, लकडगंज, बागडगंज, नागपूर – ४४०००८, महाराष्ट्र, भारत
Contact: 9371001503 Email: info@rajasthangasesltd.com
Web: www.rsl.in CIN: L64990MH1993PLC272204

३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि तीन महिन्यांच्या अलेखापरीक्षित आर्थिक निकालांचा उतारा
(प्रति इक्विटी शेअर डेटा वगळता, आकडे लाखांमध्ये आहेत)

| अ. क्र. | तपशील | ३०.०६.२०२६ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२६ रोजी संपलेली तिमाही (लेखापरीक्षित) | ३०.०६.२०२५ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२६ रोजी संपलेले वर्ष (लेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | संचालनातून मिळणारे एकूण उत्पन्न | 973.67 | 7,614.00 | 983.87 | 13,271.21 |
| 2 | कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी) | (486.90) | 7,293.63 | 960.17 | 10,430.72 |
| 3 | कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) करपूर्व (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | (486.90) | 7,293.63 | 960.17 | 10,430.72 |
| 4 | कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) करपश्चात (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | (486.90) | 6,114.07 | 960.17 | 8,099.41 |
| 5 | कालावधीतील एकूण सर्वसमावेशक उत्पन्न कालावधीतील नफा / (तोटा) (करपश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश | (486.90) | 6,114.07 | 960.17 | 8,099.41 |
| 6 | समभाग भांडवल | 2,306.21 | 2,306.21 | 2,306.21 | 2,306.21 |
| 7 | राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून) | - | - | - | 9384.25 |
| 8 | प्रति शेअर उत्पन्न (प्रत्येकी रु. ३/- च्या शेअरसाठी) (चालू आणि बंद केलेले कामकाज) | | | | |
| | १. मूळ: | (0.63) | 7.95 | 1.25 | 10.54 |
| | २. सौम्य: | (0.63) | 7.95 | 1.25 | 10.54 |

टीप:
अ. वरील माहिती ही, सेबी (सूचीबद्धता आणि इतर प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत, १३ ऑगस्ट, २०२६ रोजी स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या ३० जून, २०२६ रोजीच्या त्रैमासिक आर्थिक निकालांच्या तपशीलवार नमुन्याचा एक उतारा आहे. त्रैमासिक आर्थिक निकालांचा संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर (www.bseindia.com) आणि सूचीबद्ध कंपनीच्या www.rsl.in वर उपलब्ध आहे आणि तो खाली दिलेल्या कोडद्वारे देखील पाहता येईल.
ब. वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले असून, संचालक मंडळाने त्यांच्या १३ ऑगस्ट, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत त्यांना मंजुरी दिली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील निकालांचे मर्यादित पुनरावलोकन केले असून, कोणताही बदल न केलेले लेखापरीक्षण मत व्यक्त केले आहे.

दिनांक: १३-०८-२०२६
ठिकाण: नागपूर

राजस्थान सिक्युरिटीज लिमिटेडसाठी
(पूर्वीचे नाव: राजस्थान गॅसेस लिमिटेड)
सही/-
निखिलेश खंडेलवाल
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन ०६९४५६८४

## नगर परिषद कार्यालय सावनेर जि. नागपूर
**जाहीर सूचना**

नगर परिषद सावनेर येथील महिला व बालकल्याण विभागातून नगर परिषद सावनेर शहरातील सहा अंगणवाडीमध्ये मुलांकरिता शैक्षणिक साहित्य, खेळण्याचे साहित्य, बौद्धिक किट साहित्य पुरवठा आणि न.प.चे अभ्यंकर शाळा व न.प. हायस्कूल सावनेर करिता २५ लिटर क्षमतेचे Aqua Ujala (RO+UV+COPPER) + पाणी शितकरण यंत्र (Water dispenser) तसेच प्रशासकीय ईमारत न.प. सावनेर येथे १० लिटर क्षमतेचे Aqua Ujala (RO+UV+COPPER) किवा समकक्ष कंपनीचे उत्कृष्ट दर्जाचे वाटर फिल्टर खरेदी करावयाचे असून इच्छुक अधिकृत तसेच उत्पादक / वितरक / पुरवठाधारक यांनी दिनांक १४/०८/२०२६ ते २०/०८/२०२६ कार्यालयीन वेळेत आपल्या लेटर हेड वर उपरोक्त नमूद साहित्याचे दर बंद लिफाफ्यात इच्छुक निविदा धारकाने आपले दर मुदतीस सादर करावे. मुदतीअंती दरप्रत्रक घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

मुख्याधीकारी
नगर परिषद सावनेर

**TENDER NOTICE:** SMART/**USMFPC**/Goods/04/2025-26
**Supply, Installation, Commissioning and Testing of Mini Dal Mill 250-300 kg/hr**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Umred Sashakt Mahila Farmer Producer Company Limited At. Makardhokada, Tah. Umred Dist. Nagpur-441203** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org**, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is 24/**08/2026 up to 2.00 PM**. Any updates or notices shall be published on the aforementioned website only.
**Umred Sashakt Mahila Farmer Producer Company Limited**
**At. Makardhokada, Tah. Umred Dist. Nagpur-441203**

**TENDER NOTICE:** SMART/**USMFPC**/Goods/04/2025-26
**Supply, Installation, Commissioning and Testing of Mini Dal Mill 250-300 kg/hr**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Umred Sashakt Mahila Farmer Producer Company Limited At. Makardhokada, Tah. Umred Dist. Nagpur-441203** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org**, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is 24/**08/2026 up to 2.00 PM**. Any updates or notices shall be published on the aforementioned website only.
**Umred Sashakt Mahila Farmer Producer Company Limited**
**At. Makardhokada, Tah. Umred Dist. Nagpur-441203**

**TENDER NOTICE:** SMART/**USMFPC**/Goods/04/2025-26
**Supply, Installation, Commissioning and Testing of Mini Dal Mill 250-300 kg/hr**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Umred Sashakt Mahila Farmer Producer Company Limited At. Makardhokada, Tah. Umred Dist. Nagpur-441203** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org**, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is 24/**08/2026 up to 2.00 PM**. Any updates or notices shall be published on the aforementioned website only.
**Umred Sashakt Mahila Farmer Producer Company Limited**
**At. Makardhokada, Tah. Umred Dist. Nagpur-441203**

**TENDER NOTICE:** SMART/ **USMFPC**/Goods/ 03/2025-26
**Supply, Installation, Commissioning and Testing of Flour Mill-250kg/hr**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Umred Sashakt Mahila Farmer Producer Company Limited At. Makardhokada, Tah. Umred Dist. Nagpur-441203** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org**, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is 24/**08/2026 up to 2.00 PM**. Any updates or notices shall be published on the aforementioned website only.
**Umred Sashakt Mahila Farmer Producer Company Limited**
**At. Makardhokada, Tah. Umred Dist. Nagpur-441203**